# NUTA BULLETIN

OFFICIAL JOURNAL OF NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION

Regd. No. MAHBIL/2001/4448 : Postal Registration No. ATI/RNP/078/2018-2020

**YEAR : 43)** **15th May 2018 ( No. of Pages 12 )** **( No : 04**

## *MINUTES*

### of the General Body Meeting of NAGPUR UNIVERSITY TEACHERS'ASSOCIATION held at 12.00 noon on *SUNDAY, the 29th April, 2018 at Sardar Patel Mahavidyalaya, Chandrapur*

General Body of Nagpur University Teachers' Association met at 12.00 noon on Sunday, the 29th April, 2018 at Sardar Patel Mahavidyalaya, Chandrapur. Prof.P.B.Raghuwanshi President was in the chair. The membership numbers of the members present at the meeting are as follows :-

0044, 0048, 1061, 1177, 1401, 1748, 1792, 2070, 2439, 2595, 2603, 2888, 3006, 3282, 3341, 3358, 3432, 3449, 3594, 3632, 3750, 3819, 3840, 3948, 3975, 4047, 4076, 4108, 4271, 4328, 4330, 4346, 4411, 4492, 4532, 4599, 4600, 4636, 4739, 4807, 4808, 4825, 4953, 5000, 5078, 5080, 5097, 5129, 5175, 5237, 5240, 5281, 5283, 5351, 5403, 5436, 5472, 5474, 5493, 5496, 5497, 5498, 5700,5702, 5706,5707

Signed sheets of papers recording the attendance are included on pages 74 to 78 of and will form part of, the "BOOK OF ATTENDANCE" of General Body meetings.

Agenda of the General Body meeting was circulated on pages 21 to 27 of 2018 NUTA Bulletin and further on Page 17 to 20 of 2018 NUTA Ex-file.

### ITEM NO. 719 :
### *CONFIRMATION OF MINUTES :*

**CONFIRMED** the minutes of the General Body meeting of Nagpur University Teachers' Association held at 12.00 noon on Sunday, the 26th November, 2017 at R.A. Arts, M.K. Commerce & S.R. Rathi Science College, Washim.

*Notes :- (1) Copy of the minutes was Circulated on pages 209 to 212 of 2017 NUTA Bulletin.*

*(2) Corrections, if any, were invited in the copy of the Minutes of the General Body Meeting of Nagpur University Teachers'Association held at 12.00 noon on Sunday, the 26th November, 2017 at R.A. Arts, M.K. Commerce & S.R. Rathi Science College, Washim. vide No.CIM/43 Dated 15th December, 2017 published on page 212 of 2017 NUTA Bulletin. No correction was received.*

### *विषय क्रमांक ७१९ (अ)*
### *डॉ. अरूण सातपुतळे यांच्या दुःखद निधनाबद्दल शोकप्रस्ताव*

डॉ. अरूण सातपुतळे यांच्या दुःखद निधनाबद्दल डॉ. अनिल ढगे यांनी मांडलेला पुढील शोकप्रस्ताव **संमत करण्यात आला :-**

संघटनेचे ज्येष्ठ नेते व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. अरूण शंकरराव सातपुतळे यांचे दिनांक १८ फेब्रुवारी, २०१८ रोजी दुःखद निधन झाले. मृत्यूसमयी त्यांचे वय ७४ वर्षे होते. संघटनेच्या सुरुवातीच्या कालखंडामध्ये, एखाद्या दुसऱ्या वर्षाचा अपवाद वगळता १९७७ ते २००० इतक्या प्रदिर्घ काळपर्यंत डॉ.अरूण सातपुतळे नुटाच्या कार्यकारी मंडळाचे सदस्य होते. त्यापैकी फार मोठा काळ ते नुटाचे कोषाध्यक्ष होते व त्यानंतर त्यांनी संघटनेचे उपाध्यक्षपदही भूषविले होते. कोषाध्यक्ष या नात्याने कार्य करीत असतांना त्यांनी संघटनेच्या आर्थिक कामकाजाला उत्तम शिस्त लावली. "नुटा बुलेटीनवर होणारा खर्च" हा "शैक्षणिक कामावरील खर्च समजला जाईल" अशा प्रकारचा जो निर्णय कोषाध्यक्ष या नात्याने, नागपूर धर्मदाय उपायुक्तांच्या कार्यालयात अपयश आल्यानंतर, अत्यंत चिकाटीने राज्याच्या धर्मदाय सहआयुक्तांकडे अपिल करून दिनांक १० नोव्हेंबर १९८० रोजी (CRA No. 9 of 1980 मध्ये) त्यांनी मिळविला, त्या निर्णयाने या संघटनेला कायमस्वरूपी लाभान्वित केले. नुटा बुलेटीनच्या सुरुवातीच्या 'लेटर प्रेस'च्या तंत्रज्ञानावर आधारित प्रकाशनकाळात नागपूरहून बुलेटीन प्रकाशित होत असतांना त्यांनी एकहाती ती जबाबदारी समर्थपणे पार पाडली होती. महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या (MFUCTO) कार्यकारिणीवरही ते अनेक वर्षे सदस्य होते व काही काळ महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या उपाध्यक्ष पदावर देखील त्यांनी कार्य केले होते.

डॉ. सातपुतळे यांचा जन्म बुलढाणा जिल्ह्यातील खामगाव येथे दिनांक २८ जून, १९४३ रोजी झाला. नागपूर विद्यापीठाच्या भूगर्भशास्त्र विभागातून १९६७ मध्ये पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केल्यानंतर ते त्याच विभागात अधिव्याख्याता या पदावर रुजू झाले व नंतर तीन दशकांपेक्षा अधिक काळ ते त्या विभागात कार्यरत होते. तिथे प्रपाठक पदावर असतांना व नुटाचे उपाध्यक्ष म्हणून कार्यरत असतांना राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे ३४ वे

**PROF. RAJNISH JAIN,**
Secretary
**University Grants Commission**
(Ministry of Human Resource Development, Govt. of India)
Bahadur Shah Zafar Marg, New Delhi-l10002
Ph.011-23236288/23239337 Fax : 0l l-2323 8858 E-mail : sacy.ugc@nic.in
**By Speed Post**

No.F. 23-4/2017(PS) 27th March, 2018

The Vice-Chancellors
of all Central Universities
(40 as per list attached)

The Vice-Chancellor/Director of UGC funded Deemed to be Universities (08 as per list attached)

**Sub:** Scheme of revision of pay scales of teachers and equivalent academic cadres in Universities and Colleges following the revision of pay scales of Central Government employees on the recommendations of the 7th Central Pay Gommission (CPC).

Sir/Madam.

Kindly refer to this office letter of even number dated 30th January,2018 on the subject mentioned above.

As per the instructions received from the Ministry of Human Resource Development (MHRD) vide its letter No. 1-7/2015-U.II (Pt.I) dated 26th March, 2018, it is clarified that for those centrally funded institutions whose salary commitments are being met by the UGC/ MHRD, the increased liabilities due to revision of 7th CPC pay scales **will be fully met by the Central Government.**

Yours faithfully,
(Prof. Rajnish Jain)
Secretary

कुलगुरू म्हणून त्यांची नियुक्ती झाली. १४ जानेवारी २००० ते १४ जानेवारी २००५ या काळात त्यांनी कुलगुरू म्हणून कार्य केले व आपल्या कार्याची छाप पाडली. विशेषतः विद्यापीठाच्या ज्या परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर त्यांनी कुलगुरूपदाची सूत्रे स्वीकारली ती लक्षात घेता त्यांनी यशस्वी नेतृत्त्व करून परिस्थिती हाताळली व आपल्या कामाने विद्यापीठाला पुनःप्रतिष्ठा प्राप्त करून दिली आणि त्यामुळे त्यांचा कार्यकाळ संस्मरणीय ठरला.

१९६९ मध्ये नागपूर विद्यापीठाच्या त्यावेळच्या कोर्टावर (सिनेट) ते सदस्य म्हणून निवडून आले होते. त्यानंतर ३०-३२ वर्षे विद्यापीठाची अधिसभा, व्यवस्थापन परिषद, विद्यापरिषद आणि इतर अनेक महत्त्वाच्या प्राधिकरणावर व समित्यांवर काम करण्याचा अनुभव त्यांना मिळाला होता. ते काही काळ विद्यापीठाच्या शिक्षकेतर कर्मचारी संघटनेचेही अध्यक्ष होते. डॉ. सातपुतळे यांच्या निधनामुळे संघटना, शिक्षण क्षेत्र व त्यांचे कुटुंबीय यांची फार मोठी हानी झाली आहे. त्यांच्या निधनाबद्दल ही सभा तीव्र शोकसंवेदना व्यक्त करीत आहे.

***विषय क्रमांक ७१९ (ब)***
***प्रा. व्ही. के. वसू यांच्या दुःखद***
***निधनाबद्दल शोकप्रस्ताव***

प्रा. व्ही. के. वसू यांच्या दुःखद निधनाबद्दल प्रा. सतेश्वर मोरे यांनी मांडलेला पुढील शोकप्रस्ताव **संमत करण्यात आला :-**

प्रा. व्ही. के. वसू यांचे दिनांक ३ डिसेंबर २०१७ रोजी, वयाच्या ८२ व्या वर्षी वृद्धापकाळाने निधन झाले. प्रा. वसू हे अमरावती येथील श्री. शिवाजी विज्ञान महाविद्यालयात रसायनशास्त्र या विषयाचे प्राध्यापक म्हणून निवृत्त झाले होते. ज्यावेळी प्राध्यापकांच्या व्यावसायिक जीवनाला फारसे स्थैर्य नव्हते, ते प्राप्त व्हावे, यासाठी नुटाने केलेल्या आंदोलनातील पहिल्या पिढीचे सेनानी म्हणून प्रा. वसू हे नाव अधोरेखित करावे लागेल. संघटनेप्रती असणारी निष्ठा; आणि आंदोलनामध्ये असणारा बाणेदारपणा प्रा. वसू यांनी जपला होता. संघटनेचे पदाधिकारी म्हणूनही त्यांनी जबाबदारी सांभाळली होती. व्यावसायिकतेला सन्मानित करण्यासाठी सतत होणाऱ्या नुटाच्या आंदोलनामध्ये ते ज्याप्रमाणे अग्रेसर होते, त्याचप्रमाणे सामाजिक क्षेत्रातही ते कार्यरत होते. विशेषतः स्वामी विवेकानंदांच्या विचाराने ते प्रभावित झाले होते, त्यांच्या विचारांचा प्रचार आणि प्रसार युवकांमध्ये व्हावा यासाठी त्यांनी घेतलेल्या परिश्रमाला यश आले; आणि अमरावतीच्या ज्या विवेकानंद कॉलनीमध्ये ते वास्तव्यास होते, त्याच वसाहतीमध्ये विवेकानंदाचे स्मारक आज उभे आहे.

प्रा. वसू हे संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या विविध प्राधिकरणावर होते, परंतु शारीरिक शिक्षण व रंजन मंडळावर त्यांनी केलेले कार्य अत्यंत मूलभूत स्वरूपाचे आणि मोलाचे होते. त्याचा ठसा या मंडळावर कायम उमटला आहे.

अमरावती परिसरातल्या शैक्षणिक क्षेत्राबरोबरच सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्रातही त्यांचे नाव सन्मानाने घेतले जाते. त्यांच्या निधनाने संघटनेचा एक लढवय्या सेनानी, सामाजिक क्षेत्रातील तळमळीचा कार्यकर्ता आणि विद्यार्थीप्रिय प्राध्यापकाला आम्ही मुकलो आहोत. त्यांच्या निधनाबद्दल ही सभा तीव्र शोकसंवेदना व्यक्त करीत आहे.

***विषय क्रमांक ७१९ (क)***
***प्रा. अनिल वाघमारे यांच्या दुःखद***
***निधनाबद्दल शोकप्रस्ताव***

प्रा. अनिल वाघमारे यांच्या दुःखद निधनाबद्दल डॉ. सुभाष गावंडे यांनी मांडलेला पुढील शोकप्रस्ताव **संमत करण्यात आला :-**

प्रा. अनिल वाघमारे यांचे दिनांक ८ मार्च २०१८ रोजी वयाच्या ५२ व्या

## NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION

### *पीएच.डी पदवी प्राप्त केल्यानंतर तीन उत्तेजनार्थ वेतनवाढी देतांना सहसंचालक उच्च शिक्षण, नागपूर यांच्याकडून दिली जाणारी भेदभावपूर्ण वागणूक*

# *सभेची सूचना*

उच्च शिक्षण सहसंचालक नागपूर विभाग, नागपूर यांच्या अधिकारक्षेत्राखालील भौगोलिक क्षेत्र महाराष्ट्राचाच एक भाग आहे याबाबीचा त्यांच्या कार्यालयाला संपूर्णपणे विसर पडलेला आहे असे दिसून येते. विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकाने सेवांतर्गत पीएच.डी. ही संशोधनात्मक पदवी प्राप्त केली असेल तर अशा शिक्षकाला उत्तेजनार्थ तीन वेतनवाढी देण्याचे धोरण विद्यापीठ अनुदान आयोगाने स्वीकारल्यानंतर महाराष्ट्र शासनाने दिनांक १२ ऑगस्ट २००९ रोजी शासननिर्णय निर्गमित करून या तरतुदीची महाराष्ट्रामध्ये प्रत्यक्षात अंमलबजावणी सुरू केली.

नागपूर विभाग सोडून महाराष्ट्राच्या सर्वच विभागात ह्या तीन उत्तेजनार्थ वेतनवाढी अदा करतांना पीएच.डी. ही पदवी प्रदान करण्याच्या **विद्यापीठाच्या अधिसूचनेच्या दिवशी असलेल्या मूळ वेतन व श्रेणी वेतनावर (Basic Pay + AGP) ही वेतनवाढ आकारली जाते व त्याप्रमाणे ती अदा केली जाते.** सहसंचालक, उच्च शिक्षण, नागपूर विभाग, नागपूर हे मात्र पीएच.डी. ही पदवी प्रदान करण्यात आल्याच्या अधिसूचनेच्या दिवशी असलेल्या मूळ वेतन व श्रेणी वेतनावर (Basic Pay + AGP) या वेतनवाढीचे मोजमाप करण्यास सतत नकार देत आहेत. त्यांच्या या भेदभावपूर्ण वागणुकीमुळे अनेक शिक्षकांवर वेतननिश्चितीमध्ये अन्याय झालेला आहे.

महाराष्ट्रातील इतर विभागातील अशा सर्व शिक्षकांना दिल्या जाणाऱ्या वागणुकीपेक्षा वेगळी व भेदभावपूर्ण वागणूक नागपूर विभागातील शिक्षकांना देण्याचा नागपूर विभागाच्या उच्च शिक्षण सहसंचालकांच्या कार्यालयाचा हा प्रयत्न भारतीय घटनेच्या कलम १४ चा सरळ सरळ भंग करणारा आहे. याबाबतीत संघटनेच्या नेतृत्त्वाखाली न्यायालयीन संघर्ष उभा करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या निर्णयाच्या अंमलबजावणीचा एक भाग म्हणून अशा भेदभावपूर्ण वागणुकीने विपरितरित्या प्रभावित झालेल्या नागपूर विभागातील दोनही विद्यापीठांच्या क्षेत्रातील अशा प्राध्यापकांच्या बैठकीचे आयोजन करण्यात आलेले असून बैठकीचा दिवस, दिनांक वेळ व स्थळ खालील तक्त्यात दिल्याप्रमाणे आहे.

| तक्ता |
|---|
| **सभेचे ठिकाण :** हिस्लॉप कॉलेज, सिव्हिल लाईन्स, नागपूर |
| **सभेचा दिवस व दिनांक :** रविवार, दिनांक २४ जून, २०१८ |
| **सभेची वेळ :** दुपारी १.०० वाजता |

नागपूर विभागातील सर्व संबंधित प्राध्यापकांनी सभेला उपस्थित रहावे अशी विनंती आहे. बैठकीला येणाऱ्या प्रत्येक शिक्षकाने व्यक्तिशः त्याच्याशी संबंधित असलेल्या वेतननिश्चितीचे विवरणपत्र सोबत आणावे व त्याचबरोबर इतर माहितीचे तपशीलसुद्धा सोबत आणावेत अशी विनंती करण्यात येत आहे. **- डॉ. विलास ढोणे, सचिव, नुटा**

वर्षी हृदय विकाराच्या तीव्र धक्क्याने निधन झाले. प्रा. वाघमारे हे अमरावती जिल्ह्यातील तिवसा येथील वाय. डी. व्ही. डी. महाविद्यालयात इंग्रजी विषयाचे सहयोगी प्राध्यापक म्हणून कार्यरत होते. त्यांच्या मनमिळावू स्वभावामुळे विद्यार्थीप्रिय शिक्षक म्हणून परिसरात त्यांचा नावलौकिक होता. त्यांनी स्वतःप्रत जोपासलेली शिस्त आणि वक्तशीरपणा यामुळे त्यांच्यावर सोपविलेली कोणतीही जबाबदारी अगदी वेळेवर ते पार पाडत होते. दुसऱ्यांच्या सुखात आनंद मानणाऱ्या या प्राध्यापकाने आपल्या महाविद्यालयातील सहकारी प्राध्यापकांचे वाढदिवस अगदी स्वतः न चुकता मनःपूर्वक प्राध्यापक कक्षात साजरे केले आहेत. संघटनेच्या कोणत्याही आंदोलनात सहभागाचा पहिला होकार प्रा. वाघमारे यांचेकडूनच प्राप्त होत असे. ग्रामीण भागातील महाविद्यालयातील शिक्षक असल्यामुळे ग्रामीण विद्यार्थ्यांच्या समस्यांची जाण त्यांना होती. त्यामुळे या विद्यार्थ्यांप्रती त्यांच्या मनात विशेष आपुलकी होती. सामाजिक जाणिवेने त्यांना सहकार्य करून त्यांच्या अडचणी दूर करण्यासाठी ते सतत प्रयत्नशील असायचे.

त्यांच्या निधनाने सामाजिक जाण असणाऱ्या विद्यार्थीप्रिय प्राध्यापकाला आणि संघटनेप्रती निष्ठा असलेल्या एका आंदोलकाला आपण मुकलो आहोत. त्यांच्या निधनाबद्दल ही सभा तीव्र शोकसंवेदना व्यक्त करीत आहे.

शोकप्रस्ताव मांडणाऱ्या सदस्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. सभाध्यक्षांनी सुद्धा आपल्या भावना व्यक्त केल्या. **सभेने दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून दिवंगत सदस्यांना आपली आदरांजली वाहिली.** संमत केलेल्या शोकप्रस्तावाची प्रत संघटनेच्या वतीने सचिव शोकाकुल कुटुंबियांकडे पाठवतील असे सभाध्यक्षांनी सांगितले.

## ITEM NO. 720 :
## *APPROVAL TO THE ANNUAL REPORT :*

**CONSIDERED AND APPROVED** the Annual Report regarding the working of the Association for the calendar year ending on 31st December, 2017.

***Notes :*** *(i) As per Article VI (b) (iii) of the Constitution of NUTA, the Annual Report of the working of the Association is prepared by the Executive Committee (vide item No.2 of 2018) and was placed for the approval of the General Body.*

*(ii) The Copy of the Annual Report was circulated in 2018 NUTA Bulletin on page 24 to 27.*

*(iii) Dr. Vilas Dhone, Secretary presented the Annual Report on behalf of the Executive Committee.*

## ITEM NO. 721 :
## *APPROVAL TO THE ANNUAL BUDGET :*

**APPROVED** the Annual Budget of the Association for the Financial year commencing on 1st April, 2018.

***Notes : (i)*** *Dr. Prakash Tayde, Treasurer, NUTA, presented the Budget on behalf of the Executive Committee.* ***(ii)*** *The copy of the Budget was circulated on page No.23 of 2018 NUTA Bulletin.*

## ITEM NO. 722 :
## *APPOINTMENT OF THE AUDITORS :*

**CONSIDERED AND APPROVED** the following resolution for the appointment of Auditors for the Financial year ending on 31st March, 2018 namely :-

"**C.R.Sagdeo & Co. Chartered Accountant "Prabha Niwas" Nagpur be appointed as auditor for the Financial year ending on the 31st March 2018**"

***Notes :*** *(i) As per Article VII of the Constitution of NUTA the "General Body shall appoint auditors annually in the Annual Meeting of the Association."*

*(ii) The Executive Committee resolved to recommend the above resolution, (Vide item No. 4 of 2018) which was placed before the General Body for its approval.*

*(iii) Dr. Prakash Tayde, Treasurer, on behalf of the Executive Committee, moved the above resolution.*

## ITEM NO. 723 :
## *SUBMISSION OF STATEMENTS OFAUDITED ACCOUNTS FOR THE YEAR ENDING ON 31ST MARCH 2017*

**NOTED** the submission of statements of Audited Accounts of Nagpur University Teachers' Association for the year ending on 31st March, 2017 to The Deputy Charity Commissioner Nagpur region, Nagpur by The Secretary NUTA, **DR.VILAS DHONE** vide his letter No. NUTA/CC/01/2018 Dated 12/01/2018.

***Notes :*** *(1) Copy of the letter No.NUTA/CC/01/2018, Dated 12/01/2018 regarding Submission of Audited Accounts was circulated on page 28 of 2018 NUTA Bulletin.*

*(2) Statement of Audited Accounts of Nagpur University Teachers' Association for the year ending on 31st March, 2017 were approved by the* ***Executive Committee*** *in its meeting held on 22nd October, 2017 vide item no. 45, Agenda on page 81, Minutes on page 92, Enclosures on pages 78 to 80 of 2017 Ex-file.*

*(3) Statements of Audited Accounts of Nagpur University Teachers' Association for the year ending on 31st March, 2017 were approved by* ***General Body*** *in its meeting held on 26th November, 2017 vide item no.709, Agenda on page 165, Minutes on page 210, Enclosures on pages 166 & 167 of 2017 NUTA Bulletin.*

### NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION

To,
The joint Director (Higher Education)
Office of the Joint Director,
Nagpur /Amravati

**DATE : 6.4.2018**

**Sub:** Implementation of the Honb'le High court order dated 16 March, 2018 in W.P. No. 4908/2016

Sir/Madam,

(1) Nagpur University Teachers' Association (NUTA) and 17 other petitioners had filed a Writ Petition No. 4908/2016 in the High court of Judicature at Bombay, Nagpur Bench seeking direction to the respondents to extend to them the benefit of revised pension, by ignoring cut off date prescribed as 27-2-2009.

(2) Honb'le High court was pleased to pass the following order in the said petition on 16th March,2018:

*"4. In view of these developments, it is apparent that petitioners need to be given benefit of government resolution dated 27.2.2009, if they are otherwise eligible for the same.*

*5. In Annexure-A with the Writ Petition, petitioners have given name of their college, date of appointment and date of superannuation. The respective Colleges accordingly have to process the papers and submit the same to respondent nos.4 and 5. After receipt of those papers respondent nos.4 and 5 have to verify the correctness thereof and then ignoring the cut off date, if petitioners are otherwise eligible, extend to them benefit of revised pension.*

*6. Accordingly, we direct respondent nos. 4 and 5 to complete this process of verification within a period of three months, after necessary papers are received by their respective office."*

(3) I have, therefore, to request you to initiate steps to implement the above order in respect of the petitioners and the similarly situated teachers. A copy of the High court order is enclosed for your ready reference. The Association would be grateful to you if the action taken at your end is intimated to it.

Thanking you

Yours Sincerely,

**(Dr Anil Dhage)**

Former Secretary and the first Petitioner

**Encl:-** A copy of the High Court order of 16 March, 2018

*(4) After the approvals mentioned at notes 2 &3 above the Statements of Audited Accounts of Nagpur University Teachers' Association for the year ending on 31st March, 2017 were submitted to the Deputy Charity Commissioner, Nagpur region, Nagpur by the secretary as mentioned at note 1 above.*

## ITEM NO. 724 : *ANNOUNCEMENT IN RESPECT OF CHANGE OF ADDRESS :*

**NOTED** the announcement in respect of Change of address : Acknowledgment No. 34.

***Notes :*** *Announcement in respect of Change of address : Acknowledgment No. 34 was circulated on page 23 of 2018 NUTA Bulletin.*

## ITEM NO. 725 : *HIGH COURT JUDGEMENT IN W.P.NO. 4908/2016.*

**NOTED** the High Court judgement dated 16th March 2018 IN W.P.NO. 4908/2016

***Note :-*** *High Court judgement dated 16th March 2018 IN W.P.NO. 4908/2016 was circulated on page 24 of 2018 NUTA Bulletin.*

## विषय क्रमांक ७२६ : *सेवानिवृत्त प्राध्यापकांच्या संघटनात्मक सहभागाबाबत धोरणात्मक निर्णय*

कार्यकारी मंडळाच्या वतीने प्रा. अनिल ढगे यांनी मांडलेला "सेवानिवृत्त प्राध्यापकांच्या संघटनात्मक सहभागाबाबत धोरणात्मक निर्णय" या विषयावर महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळाच्या रविवार, दिनांक २८ जानेवारी २०१८ रोजीच्या बैठकीत मंजूर झालेला **ठराव विचारात घेण्यात आला व संमत करण्यात आला.**

***नोट्स :-*** *(१) "सेवानिवृत्त प्राध्यापकांच्या संघटनात्मक सहभागाबाबत धोरणात्मक निर्णय" या विषयावर महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळाच्या रविवार, दिनांक २८ जानेवारी २०१८ रोजीच्या बैठकीत संमत झालेला ठराव हा सन २०१८ च्या नुटा बुलेटीनच्या पृष्ठ ९ वर प्रसृत करण्यात आलेला होता.*

*(2) This Resolution was also Considered and Approved by the General Body Meeting of MFUCTO held on Sunday, the 18th February 2018.*

***महाराष्ट्र शासन***

*सहसंचालक (उच्च शिक्षण), नागपूर विभाग,*

जुने मॉरीस कॉलेज इमारत परिसर, नागपूर

Website : dirhe.in/jdnagpur/ E-mail :jdhengp@rediffmail.com

Phone No. 0712 2561713 Fax No. 0712 2554210

क्रमांक :- उशिनाग/न्या.प्र.से.नि./२३०६/१८

**दिनांक :- १३.०४.२०१८**

प्रति,
डॉ. अनिल ढगे
माजी सचिव, नुटा
संकल्प सहनिवास, खरे टाऊन
धरमपेठ नागपूर - ४४० ०१०.

**विषय :-** रिट याचिका क्रमांक ४९०८/२०१६ नुटा व इतर विरुद्ध महा.शासन व इतर.

**संदर्भ :-** (१) मा. उच्च न्यायालयाचे आदेश दिनांक १६.०३.२०१८.

(२) आपले निवेदन दिनांक ०६.०४.२०१८.

उपरोक्त विषयांकित याचिकेच्या संदर्भातील आपले संदर्भाधिन निवेदनाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, सदर याचिकेमध्ये **मा. उच्च न्यायालयाने दिनांक १६.०३.२०१८ रोजी आदेश देऊन याचिकाकर्ता यांची मागणी मान्य केली आहे.**

**सदर याचिकेमधील मा. उच्च न्यायालयाच्या आदेशाची अंमलबजावणी करण्याची बाब शासनाच्या ध्येय धोरणाशी निगडीत असल्याने** या कार्यालयाच्या दिनांक २०.०३.२०१८, २३.०३.२०१८ व दिनांक ०७.०४.२०१८ पत्रान्वये शासन व संचालनालयाच्या स्तरावरून आदेश देण्याची विनंती करण्यात आली आहे. शासन व संचालनालयाच्या स्तरावरून आदेश प्राप्त होताच मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार याचिकाकर्ता यांना सेवानिवृत्तीचे लाभ अदा करण्यात येईल.

तसेच मा. उच्च न्यायालयाचे दिनांक १६.०३.२०१८ च्या आदेशानुसार विहित कालावधीत कार्यवाही होण्याकरीता सदर याचिकेमधील सर्व याचिकाकर्ता यांच्या सुधारित सेवानिवृत्ती वेतनाचे प्रस्ताव या कार्यालयाचे पत्र क्रमांक १९०३ दि. २७.०३.२०१८ अन्वये महाविद्यालयाकडून मागविण्यात आले आहेत.

सहसंचालक, उच्च शिक्षण,
नागपूर विभाग, नागपूर

सहपत्र : वरीलप्रमाणे

***महाराष्ट्र शासन***

*सहसंचालक (उच्च शिक्षण), नागपूर विभाग,*

जुने मॉरीस कॉलेज इमारत परिसर, नागपूर

Website : dirhe.in/jdnagpur/ E-mail :jdhengp@rediffmail.com

Phone No. 0712 2561713 Fax No. 0712 2554210

क्रमांक :- उशिनाग/सेनि.वि./१९०३/१८

**दिनांक :- २७.०३.२०१८**

प्रति,

(१) प्राचार्य,

सी.पी. ॲन्ड बेरार ई.एस.कॉलेज, नागपूर

जानकीदेवी बजाज विज्ञान महाविद्यालय, वर्धा

जी.एस.कॉलेज ऑफ कॉमर्स, वर्धा

यशवंत महाविद्यालय, वर्धा.

**विषय :-** याचिका क्र. ४९०८/२०१६ नुटा व इतर विरुद्ध महाराष्ट्र शासन व इतर : सुधारित सेवानिवृत्ती प्रस्ताव सादर करण्याबाबत.

**संदर्भ :-** (१) मा. उच्च न्यायालयाचे आदेश दिनांक १६.०३.२०१८.

उपरोक्त संदर्भाधिन विषयान्वये याचिका क्र. ४९०८/२०१६ व नुटा व इतर विरुद्ध महाराष्ट्र शासन व इतर मध्ये दिनांक ०१.०१.२००६ ते दिनांक २७.०२.२००९ या कालावधीतील सेवानिवृत्त याचिकाकर्त्यांचे (याचिका क्र. ४९०८/२०१६ मधील) सेवानिवृत्तीवेतन सुधारित करून फरकासह सेवानिवृत्तीवेतनाच्या लाभाची रक्कम अदा करण्यास मा. उच्च न्यायालय खंडपीठ नागपूर यांनी दिनांक १६.०३.२०१८ रोजी आदेश दिलेले आहेत.

"6. Accordingly, we direct respondent nos. 4 and 5 to complete this process of verification within a period of three months, after necessary papers are received by their respective office."

**अ. क्र.** (याचिका क्रमांक) याचिकाकर्त्यांचे नाव : महाविद्यालयाचे नाव (सेवानिवृत्ती दिनांक) आदेश दिनांक

**१** (४९०८/२०१६) श्री. बाबुराव लोलबाजी जिभकाटे : सी.पी. ॲन्ड बेरार ई.एस.कॉलेज, नागपूर (३१.०७.२००७) १६.०३.२०१८

**२** (४९०८/२०१६) श्री. नामदेव वामन भोले : जानकीदेवी बजाज कॉलेज ऑफ सायन्स, वर्धा (३१.०७.२००६) १६.०३.२०१८

**३** (४९०८/२०१६) श्री. अरविंद भगवंत सुरदास : जी.एस.कॉलेज ऑफ कॉमर्स, वर्धा (३१.०७.२००६) १६.०३.२०१८

**४** (४९०८/२०१६) श्री. पुरुषोत्तम मोतीराम खोटेले : यशवंत महाविद्यालय, वर्धा ३१.०३.२००७ १६.०३.२०१८

**५** (४९०८/२०१६) श्री. सुधाकर जगन्नाथराव मोरे : जानकीदेवी बजाज कॉलेज ऑफ सायन्स, वर्धा (२८.०२.२००६) १६.०३.२०१८

दिनांक ०१.०१.२००६ ते दिनांक २६.०२.२००९ या कालावधीत सेवानिवृत्त झालेल्या याचिकाकर्त्यांचे सेवाविषयक तपशील तपासून, पात्र ठरणाऱ्या याचिकाकर्त्यांना देय ठरणाऱ्या रकमेची अचूक परिगणना करून आपल्या महाविद्यालयात कार्यरत असलेल्या याचिकाकर्त्यांचे सुधारित सेवानिवृत्ती वेतन प्रस्ताव या कार्यालयामार्फत मा. महालेखापाल नागपूर यांचेकडे सादर करण्याकरीता या कार्यालयास मुळ सेवापुस्तक, प्रस्ताव तीन प्रतीत व मा. महालेखाकार नागपूर यांचे सेवानिवृत्ती प्रकरण मंजुरी आदेश्याच्या छायांकित प्रतीसह सादर करावा.

सहसंचालक, उच्च शिक्षण,
नागपूर विभाग, नागपूर

प्रत :- मा. महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता) द्वितीय, महाराष्ट्र - नागपूर.

## विषय क्रमांक ७२७ :
## *पीएच.डी. पदवी प्राप्त केल्यानंतर तीन उत्तेजनार्थ वेतनवाढी देतांना सहसंचालक, उच्च शिक्षण, नागपूर यांच्याकडून दिली जाणारी भेदभावपूर्ण वागणूक*

संघटनेचे सहसचिव डॉ. अजित जाचक यांनी अध्यक्षांच्या संमतीने व सभागृहाच्या परवानगीने मांडलेला **पुढील प्रस्ताव संमत करण्यात आला. :-**

विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकाने सेवांतर्गत पीएच.डी. ही संशोधनात्मक पदवी प्राप्त केली असेल तर अशा शिक्षकाला उत्तेजनार्थ तीन वेतनवाढी देण्याचे धोरण विद्यापीठ अनुदान आयोगाने स्वीकारल्यानंतर महाराष्ट्र शासनाने दिनांक १२ ऑगस्ट २००९ रोजी शासननिर्णय निर्गमित करून या तरतुदीची महाराष्ट्रामध्ये प्रत्यक्षात अंमलबजावणी सुरू केली.

नागपूर विभाग सोडून महाराष्ट्राच्या सर्वच विभागात ह्या तीन उत्तेजनार्थ वेतनवाढी अदा करतांना पीएच.डी. ही पदवी प्रदान करण्याच्या **विद्यापीठाच्या अधिसूचनेच्या दिवशी असलेल्या मूळ वेतन व श्रेणी वेतनावर (Basic Pay + AGP) ही वेतनवाढ आकारली जाते व त्याप्रमाणे ती अदा केली जाते.** सहसंचालक, उच्च शिक्षण, नागपूर विभाग, नागपूर हे मात्र पीएच.डी. ही पदवी प्रदान करण्यात आल्याच्या अधिसूचनेच्या दिवशी असलेल्या मूळ वेतन व श्रेणी वेतनावर (Basic Pay + AGP) या वेतनवाढीचे मोजमाप करण्यास सतत नकार देत आहेत. त्यांच्या या भेदभावपूर्ण वागणुकीमुळे अनेक शिक्षकांवर वेतननिश्चितीमध्ये अन्याय झालेला आहे.

महाराष्ट्रातील इतर विभागातील अशा सर्व शिक्षकांना दिल्या जाणाऱ्या वागणुकीपेक्षा वेगळी व भेदभावपूर्ण वागणूक नागपूर विभागातील शिक्षकांना देण्याचा नागपूर विभागाच्या उच्च शिक्षण सहसंचालकांच्या कार्यालयाचा हा प्रयत्न भारतीय घटनेच्या कलम १४ चा सरळ सरळ भंग करणारा आहे. **अतएव याबाबतीत संघटनेच्या नेतृत्त्वाखाली न्यायालयीन संघर्ष उभा करण्याचा निर्णय घेण्यात येत आहे.**

*राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचाऱ्यांना मंजूर करण्यात येणाऱ्या महागाई भत्त्याच्या दरात दि. १ जुलै, २०१७ पासून सुधारणा करण्याबाबत*

***महाराष्ट्र शासन : वित्त विभाग***

***शासन निर्णय क्रमांक : मभवा-२०१७/प्र.क्र.११/सेवा-९***

**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२**

**तारीख : २८ फेब्रुवारी २०१८**

**वाचा** :- शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक : मभवा-२०१७/ प्र.क्र.११/सेवा-९ दि. २१ सप्टेंबर, २०१७

**शासन निर्णय**

राज्य शासकीय कर्मचारी व इतर पात्र पूर्णकालिक कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्याच्या दरात सुधारणा करण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता.

२. शासन असे आदेश देत आहे की, **१ जुलै, २०१७** पासून ६ व्या वेतन आयोगानुसार सुधारित वेतनसंरचनेतील मूळ वेतनावरील (वेतनबँडमधील वेतन अधिक ग्रेड वेतन) **अनुज्ञेय महागाई भत्त्याचा दर १३६% वरून १३९% करण्यात यावा.** दि. १ फेब्रुवारी, २०१८ पासून सदर महागाई भत्ता वाढ रोखीने देण्यात यावी. दि. **१ जुलै, २०१७ ते दि. ३१ जानेवारी, २०१८ या सात महिन्यांच्या कालावधीतील थकबाकीबाबत स्वतंत्रपणे निर्णय घेण्यात येईल.**

३. महागाई भत्त्याची रक्कम प्रदान करण्यासंदर्भातील विद्यमान तरतुदी व कार्यपद्धती आहे त्याचप्रकारे यापुढे लागू राहील.

४. यावर होणारा खर्च संबंधित शासकीय कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्ते ज्या लेखाशीर्षाखाली खर्ची टाकण्यात येतात, त्या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकून त्याखालील मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा. अनुदानप्राप्त संस्था व जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांच्या बाबतीत, संबंधित प्रमुख लेखाशीर्षाखालील ज्या उप लेखाशिर्षाखाली त्यांच्या सहाय्यक अनुदानाबाबतचा खर्च खर्ची टाकण्यात येतो, त्या उप लेखाशीर्षाखाली हा खर्च खर्ची टाकण्यात यावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१८०२२८१३०३१३९६०५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**(भा.ज.गाडेकर)**

उप सचिव, महाराष्ट्र शासन

Digitally signed by Bhalchandra Jagannath Gadekar DN : c=IN, o=Government of Maharashtra, ou=Finance Department, postal Code=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=93c 75178c34e1daaeb069f4e437a48fd302aabd765450129e4447d5a1da1f2a,serialNumber=d2671e08db f49e6a42b865d0 26c 3f07bc1eb8254056eab8fa6b4b0fb72dd47ba cn=Bhalchandra Jagannath Gadekar Date : 2018.02.28 13:05:43+05'30'

*****

PR :- (7) NB 2011 P 130 (8) NB 2012 P 48 (9) NB 2013 P 08 (10) NB 2013 P 90 (11) NB 2013 P 140 (12) NB 2013 P 247 (13) NB 2014 P 113 (14) NB 2015 P 57 (15) NB 2016 P 84 (16) NB 2016 P 86 (17) NB 2016 P 139 (18) NB 2017 P 122 (19) NB 2017 P 172 (20) NB 2018 P 37

* AF : P 19 *

## विषय क्रमांक ७२८ :
## *सहसंचालक उच्च शिक्षण, अमरावती विभाग यांनी न्यायालयीन प्रकरणात केलेली कारवाई*

मा. उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने दिनांक १६.०३.२०१८ रोजी याचिका क्र. ४९०८/२०१६ ('नुटा' विरुद्ध युनियन ऑफ इंडिया व इतर) मध्ये दिलेल्या निर्णयाच्या संदर्भात सहसंचालक उच्च शिक्षण, अमरावती विभाग, अमरावती यांनी दिनांक ०३.०४.२०१८ रोजी सर्व संबंधित महाविद्यालयांना परिपत्रक पाठवून केलेल्या कारवाईची **नोंद घेण्यात आली.**

***नोट*** *:- मा. उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने दिनांक १६.०३.२०१८ रोजी याचिका क्र. ४९०८/२०१६ ('नुटा' विरुद्ध युनियन ऑफ इंडिया व इतर) मध्ये दिलेल्या निर्णयाच्या संदर्भात सहसंचालक उच्च शिक्षण, अमरावती विभाग, अमरावती यांनी दिनांक ०३.०४.२०१८ रोजी सर्व संबंधित महाविद्यालयांना पाठविलेले परिपत्रक सोबत पृष्ठ १८ वर प्रसृत करण्यात आले होते. हे परिपत्रक आता सन २०१८ च्या नुटा बुलेटीनच्या पृष्ठ ४३ वर प्रसृत करण्यात आले आहे.*

## विषय क्रमांक ७२९ :
## *सहसंचालक उच्च शिक्षण, नागपूर विभाग यांनी न्यायालयीन प्रकरणात करावयाची कारवाई*

**(A)** मा. उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने दिनांक १६.०३.२०१८ रोजी याचिका क्र. ४९०८/२०१६ ('नुटा' विरुद्ध युनियन ऑफ इंडिया व इतर) मध्ये दिलेल्या निर्णयाच्या संदर्भात सहसंचालक उच्च शिक्षण, नागपूर विभाग, नागपूर यांनी करावयाच्या कारवाई संदर्भात नुटाचे तत्कालीन सचिव व प्रथम याचिकाकर्ते डॉ. अनिल ढगे यांनी दिनांक ०६.०४.२०१८ रोजी सहसंचालकांना पाठविलेल्या पत्राची **नोंद घेण्यात आली.**

**(B)** डॉ. अनिल ढगे यांनी ०६.०४.२०१८ रोजी सहसंचालक, उच्च शिक्षण, नागपूर विभाग, नागपूर यांना लिहिलेले पत्र सभागृहापुढे ठेवतांना सभागृहाला अशीही माहिती दिली की, सहसंचालक, उच्च शिक्षण, नागपूर विभाग, नागपूर यांनी आपल्या या पत्राला दिनांक १३.०४.२०१८ रोजी उत्तर दिले असून त्याबाबतीत त्यांच्या स्तरावरून करीत असलेली कार्यवाही त्यांनी कळविलेली आहे. (सहसंचालक, उच्च शिक्षण, नागपूर विभाग, नागपूर यांनी १३.०४.२०१८ रोजी डॉ. अनिल ढगे यांना लिहिलेले पत्र सन २०१८ च्या नुटा बुलेटीनच्या पृष्ठ ३६ वर प्रसृत करण्यात आलेले आहे.)

**(C)** डॉ. अनिल ढगे यांना पाठविलेल्या दिनांक १३.०४.२०१८ च्या पत्रासोबत सहसंचालक, उच्च शिक्षण, नागपूर विभाग, नागपूर यांनी याबाबतीत सर्व संबंधित महाविद्यालयांना पाठविलेले दिनांक २७.०३.२०१८ रोजीचे पत्रही सोबत पाठविलेले आहे अशीही सभागृहाला माहिती दिली. (हे पत्र सन २०१८ च्या नुटा बुलेटीनच्या पृष्ठ ३६ वर प्रसृत करण्यात आलेले आहे.)

***नोट*** *:- मा. उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने दिनांक १६.०३.२०१८ रोजी याचिका क्र. ४९०८/२०१६ ('नुटा' विरुद्ध युनियन ऑफ इंडिया व इतर) मध्ये दिलेल्या निर्णयाच्या संदर्भात सहसंचालक उच्च शिक्षण, नागपूर विभाग, नागपूर यांनी करावयाच्या कारवाई संदर्भात नुटाचे तत्कालीन सचिव व प्रथम याचिकाकर्ते डॉ. अनिल ढगे यांनी दिनांक ०६.०४.२०१८ रोजी सहसंचालकांना पाठविलेले पत्र पृष्ठ १८ वर प्रसृत करण्यात आलेले होते. हे पत्र आता सन २०१८ च्या नुटा बुलेटीनच्या पृष्ठ ३५ वर प्रसृत करण्यात आले आहे.*

### विषय क्रमांक ७३० :
### *महागाई भत्त्याच्या दरात दि. १ जुलै, २०१७ पासून सुधारणा*

राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचाऱ्यांना मंजूर करण्यात येणाऱ्या महागाई भत्त्याच्या दरात दि. १ जुलै, २०१७ पासून सुधारणा करण्याबाबतच्या महाराष्ट्र शासनाच्या वित्त विभागाने दिनांक २८ फेब्रुवारी २०१८ रोजी निर्गमित केलेल्या शासन निर्णय क्रमांक : मभवा-२०१७/प्र.क्र.११/सेवा-९ ची **नोंद घेण्यात आली.**

***नोट** :- राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचाऱ्यांना मंजूर करण्यात येणाऱ्या महागाई भत्त्याच्या दरात दि. १ जुलै, २०१७ पासून सुधारणा करण्याबाबतच्या महाराष्ट्र शासनाच्या वित्त विभागाने दिनांक २८ फेब्रुवारी २०१८ रोजी निर्गमित केलेल्या शासन निर्णय क्रमांक : मभवा-२०१७/प्र.क्र.११/सेवा-९ सोबत पृष्ठ १९ वर प्रसृत करण्यात आलेला होता. हा शासननिर्णय आता सन २०१८ च्या नुटा बुलेटीनच्या पृष्ठ ३७ वर प्रसृत करण्यात आलेला आहे.*

### ITEM NO. 731 :
### *Dearness Relief on Pension/ Family Pension from1st July, 2017.*

**NOTED** the Government Resolution No.: DRP-2018/CR.75/SER-4 Dated 16th March, 2018 issued by the Finance Department Government of Maharashtra regarding Dearness Relief on Pension/ Family Pension from 1st July, 2017.

***Note :-** The Government Resolution No.: DRP-2018/CR.75/SER-4 Dated 16th March, 2018 issued by the Finance Department Government of Maharashtra regarding Dearness Relief on Pension/ Family Pension from 1st July, 2017 was circulated on page 20 of 2018 Ex-file. This Government Resolution is now circulated on page 38 of 2018 NUTA Bulletin.*

### ITEM NO. 732 :
### *FULL FUNDING FOR CENTRAL UNIVERSITIES*

**NOTED** the Letter from the Secretary University Grants Commission dated 27th March 2018 regarding Scheme of revision of pay scales of teachers and equivalent academic cadres in **Central Universities** following the revision of pay scales of Central Government employees on the recommendations of the 7th Central Pay Gommission (CPC) declaring that "the increased liabilities due to revision of 7th CPC pay scales **will be fully met by the Central Government." in respect of Central Universities.**

***Note :-** The Letter from the Secretary University Grants Commission dated 27th March 2018 was circulated on page 19 of 2018 Ex-file. This Letter is now circulated on page 33 of 2018 NUTA Bulletin.*

### *विषय क्रमांक ७३३*
### *निवडश्रेणीमध्ये ३ वर्षे किंवा त्यापेक्षा जास्त सेवा होऊन १ जानेवारी, २००६ पूर्वी सेवानिवृत्त झालेल्या अधिव्याख्यात्यांना भेदभावपूर्ण वागणूक*

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने घडलेल्या **पुढील घटनाक्रमाची माहिती अध्यक्षांनी सभागृहापुढे ठेवली :-**

**१.** मा. नागपूर खंडपीठासमोर उपरोक्त बाबतीत संघटनेतर्फे सन २०१६ ची याचिका क्रमांक ३०५२ दाखल करण्यात आलेली आहे. त्या याचिकेसोबत तत्सम इतरही अनेक याचिका जोडण्यात आल्या असून त्या एकत्रितरीत्या सुनावणीत आहेत. या सुनावणीमध्ये संबंधित असलेल्या सर्व शिक्षकांच्या माहितीसाठी पुढील

Dearness Relief on Pension/ Family Pension 139% from1st July, 2017.

## GOVERNMENT OF MAHARASHTRA : FINANCE DEPARTMENT

**Government Resolution No.: DRP-2018/CR.75/SER-4**

Hutatma Rajguru Chawk, Madam Cama Road, Mantralaya, Mumbai 400 032. **DATE : 16 MARCH, 2018**

**Read -** 1. Government Resolution No.: DRP-2017/C.R 59/SER-4, Date 25.09.2017

## RESOLUTION

Government is pleased to decide that the rate of dearness relief with effect from 1st July,2017 will be enhanced from 136% to 139% to the State Government pensioners /family pensioners on their Basic Pension/Family Pension and Dearness pension/ Dearness family pension (if any). And dearness relief will be payable in cash from 1st February, 2018. Also the order in respect of arrears during 7 months from 1st July, 2017 to 31st January, 2018 will be issue separately.

2. It will be the responsibility of the Pension Disbursing Authority, i.e. Pay and accounts Officer, Mumbai/Treasury Officers, as the case may be, to calculate the quantum of dearness relief payable in each individual case.

3. Government is also pleased to direct that above decision should mutatis mutandis, apply to those pensioners including family pensioners of Recognised and Aided Educational Institutions, Non-Agricultural Universities and Affiliated NonGovernment colleges and Agricultural Universities to whom the pension scheme is made applicable.

4. In exercise of the powers conferred by the proviso to Section 248 of the Maharashtra Zilla Parishads and Panchayat Samities Act, 1961 (Mah.V of 1962) and of all the other powers enabling it in that behalf, Government is further pleased to decide that the above decision shall apply to the pensioners including family pensioners of Zilla Parishads.

5. State Government Employees who had drawn lumpsum payment on absorption in a PSU/Autonomous body/local Bodies and have become entitled to restoration of 1/3rd commuted portion of pension as well as revision of the restored amount in terms of Government Resolution, Finance Department, No.COP1099/306/SER-4, dated 15th November, 1999 Such employes also applicable for dearness allowance at the prescribed rate and from the date, prescribed in paragraph 1 of Government Resolution, Finance Department, No.COP1001/50/SER-4, dated 9th April, 2001."Government Resolution No.: DRP-2018/CR.75/SER-4

6. The expenditure on this account should be debited to the Budget Heads to which the retirement benefits of the employees mentioned in the above paras are debited and should be met form the grants sanctioned thereunder.

7. All orders in force in regard to the payment of relief on pension sanctioned by Government form time to time will, mutatis mutandis, apply to the dearness relief now sanctioned.

This Government resolution of Maharashtra Government is available at the website www. maharashtra. gov.in. Reference no. for this is 201803161419276305. This order has been signed digitally.

By order and in the name of the Governor of Maharashtra.

( Anudeep Dighe )
Deputy Secretary,
Government of Maharashtra

*****

PR :- (7) NB 2011 P 130 (8) NB 2012 P 48 (9) NB 2013 P 08 (10) NB 2013 P 91 (11) NB 2013 P 141 (12) NB 2013 P 250 (13) NB 2014 P 112 (14) NB 2015 P 56 (15) NB 2016 P 85 (16) NB 2016 P 87 (17) NB 2016 P 143 (18) NB 2017 P 123 (19) NB 2017 P 172 (20) NB 2018 P 37 * AF : P 19 *

घटनाक्रम नमूद करण्यात येत आहे.

२. दिनांक १३ डिसेंबर २०१७ रोजी मा. उच्च न्यायालयाच्या मुंबई खंडपीठाने सन २०१४ च्या याचिका क्रमांक १७९७ मध्ये एक निर्णय दिलेला आहे. राज्यशासनातील २०-२५ उच्चस्तरीय अधिकारी ज्यांना उपसचिव पदावरून सहसचिव पदावर बढती मिळालेली होती व सहसचिव पदावर ३ वर्षे किंवा त्यापेक्षा जास्त सेवा करून ०१.०१.२००६ पूर्वी ते सेवानिवृत्त झालेले होते. "सहसचिव पदाच्या १ जानेवारी २००६ नंतरच्या चौथ्या पे-बॅन्डच्या किमान पातळीच्या ५० टक्के वर आमचे सेवानिवृत्ती वेतन निश्चित केले जावे" अशी मागणी त्यांनी केली होती. ही मागणी मा.उच्च न्यायालयाने फेटाळून लावलेली आहे. मुळात या सर्व अधिकाऱ्यांचे प्रकरण महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणासमोर सन २०११ चे T.A. 2 म्हणून दाखल झालेले होते. त्याबाबत न्यायाधिकरणाने आदेश पारित करून त्यांची मागणी फेटाळून लावली होती.

३. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाच्या आदेशाच्या विरोधात मा.उच्च न्यायालयाच्या मुंबई खंडपीठासमोर या अधिकाऱ्यांनी दाखल केलेल्या सन २०१४ च्या याचिका क्रमांक १७९७ मध्ये मा. खंडपीठाने दिनांक १३ डिसेंबर २०१७ रोजी निर्णय दिला असून मा.खंडपीठाने महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाचा निर्णय कायम केलेला आहे.

४. सहसचिव दर्जाच्या शासकीय अधिकाऱ्यांच्या बाबतीत न्यायाधिकरणाचा व त्यानंतर मा. उच्च न्यायालयाचा निर्णय या अधिकाऱ्यांच्या विरोधात गेला असला तरी महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाच्या नागपूर खंडपीठाने शासकीय सेवेतील महाविद्यालयीन शिक्षक हा वेगळा वर्ग आहे असे मानून शासकीय महाविद्यालयातील शिक्षकांच्या बाजूने यापूर्वी अशाच प्रकरणात निर्णय दिलेला आहे. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाच्या नागपूर खंडपीठाने O.A.No. 72/ 2013 या प्रकरणात २० जानेवारी २०१६ रोजी निर्णय दिला असून निवडश्रेणीमध्ये ३ वर्षे किंवा त्यापेक्षा जास्त सेवा झालेल्या व २००६ पूर्वी सेवानिवृत्त झालेल्या शासकीय महाविद्यालयातून काम करणाऱ्या अधिव्याख्यात्यांच्या बाजूने निर्णय दिलेला असून त्या निर्णयाच्या विरोधात राज्यशासनाने मा.नागपूर खंडपीठासमोर सन २०१६ ची याचिका क्रमांक ६५९९ दाखल केली असून प्रशासकीय न्यायाधिकरणाच्या नागपूर खंडपीठाने दिलेला निर्णय रद्दबादल करावा अशी मागणी केली आहे.

५. संघटनेच्या (३०५२/२०१६) या याचिकेसोबतच आता राज्यशासनाची ६५९९/२०१६ ही याचिका सुनावणीत आहे. त्यात इतरही सात आठ याचिका एकत्रितरीत्या सुनावणीत सोबतच आहेत. या सुनावणीत शासनातर्फे मुंबई खंडपीठाचा १३ डिसेंबर २०१७ चा निर्णय याबाबतीत निश्चितपणे पुढे केला जाईल. या सुनावणीत समाविष्ट असलेल्या याचिकाकर्त्या शिक्षकांची संख्या बरीच मोठी आहे. या सर्व शिक्षकांनी आपापल्या अधिवक्त्यांमार्फत मा.खंडपीठासमोर पुढील वस्तुस्थिती ठेवावी असे नमूद करण्यात येत आहे.

